# नवजीवन कॉलेज मध्ये १३ जानेवारीला जॉब फेअर

नाशिक – बेरोजगार युवक व विविध नोकरीच्या संधी कंपन्यांची सांगड घालणारा मेगा जॉब फेअर (नोकरी मेळावा) येत्या रविवारी (१३ जानेवारी २०१८) रोजी सकाळी ८ वाजता नवजीवन कॉलेज कॅम्पस शिवशक्ती चौक, सिडको, नाशिक येथे होणार आहे. आईमा, AISECT-NSDC, चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि नवजीवन कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या फेअरमध्ये ५० पेक्षा जास्त नामांकित कंपन्या आणि बँकांनी सहभाग घेणार असून, कोणत्या क्षेत्रात कसे करिअर करता येईल, काय संधी उपलब्ध आहेत. अभ्यासक्रम कसे आहेत याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. एम.बी.ए. कॉम्प्युटर, आई.टी.आई. सिव्हिल इंजिनिअरिंग, बीएसी केमिस्ट्री या अभ्यासक्रमातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थी पण सहभागी होऊ शकता. मेळाव्यामध्ये नाशिक, मुंबई, पुणे येथील कंपन्या २०० ते २५० पदासाठी मुलाखती घेण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवाराची निवड करणार आहेत. सुशिक्षित बेरोजगारांनी सर्व मूळ प्रमाणपत्र सकाळी ८ वा. नोंदणीसाठी उपस्थितराहून या संधीचा लाभ घ्यावा. उमेदवारांच्या नोंदणीनुसार मुलाखतीसाठी प्राधान्यक्रम आहे. यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांना कुठलीही प्रवेश फी आकारली जाणार नसून उमेदवार एकाच दिवशी इतर कंपन्यांना सुद्धा मुलाखती देऊ शकतात.

**Divya Marathi 12th Jan 2018**